मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत
राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती बैठक क्र.९ आणि सीबीओ निवड समिती बैठक क्र.८
दि.०४.१०.२०२२ चे इतिवृत्त

प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४/१०/२०२२ रोजी कृषि आयुक्तालय, पुणे येथे खालीलप्रमाणे बैठका संपन्न झाल्या.

अ) राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीची (SPAC) बैठक क्र. ९
ब) सीबीओ निवड समिती बैठक क्र. ८

सदर बैठकांना प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे.

**सदर बैठकांमध्ये झालेली चर्चा व त्याअनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे:-**

## बैठक क्र. अ) :- राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती (SPAC)

बैठकीच्या सुरुवातीला स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार उपप्रकल्प मंजुरीसाठी प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती व उपप्रकल्प मंजूरीचे निकष इ. बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सर्व सन्माननीय समिती सदस्यांना मंजूर करावयाच्या उपप्रकल्पाबाबतची माहितीची PPT सभेपुर्वी मेल व्दारे परीपत्रीत करण्यात आली होती. बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या व समितीने मंजूरी दिलेल्या उपप्रकल्पाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | पीआययू | एकुण प्राप्त FPP संख्या | SPAC-१, ५, ६,७ व ८ नुसार मंजुरी दिलेल्या FPP ची संख्या | SPAC- ९ समितीमध्ये मंजुरीस सादर FPP संख्या | SPAC-९ ने मंजुरी दिलेल्या FPP ची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि | ३८९ | २३२ | ५५ | ४२ |
| २ | व्हीएसटीएफ | २५ | २० | ०३ | ०३ |
| ३ | माविम | ४८ | ३८ | ११ | ११ |
| ४ | MSRLM | १५ | ०८ | ०१ | ०१ |
| ५ | पशुसंवर्धन | ०७ | ०४ | ०० | ०० |
| ६ | MCDC | १० | ०९ | ०० | ०० |
| | एकूण | ४९४ | ३११ | ७० | ५७ |

प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणानिहाय उपप्रकल्पांना अटी शर्तींच्या अधीन राहून मंजूरी दिलेल्या समुदाय आधारित संस्थांची यादी खालीलप्रमाणे आहे. तसेच समुदाय आधारीत संस्थानिहाय मंजूर FPP तपशील इतिवृत्तासोबतच्या प्रपत्र १ मध्ये सादर केलेला आहे.

| अ. क्र. | जिल्हा | सीबीओचे नाव | समितीने मंजूर केलेली प्रकल्प किंमत (रु.लाखात) | समितीने मंजूर केलेले अनुदान (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| ३६) | वाशिम | नारदस ऑरोमॅटीक ऑईल प्रो. कं. लि., ता. जि. वाशिम | २६१.०२ | १५६.६१ |
| ३७) | अमरावती | कृषि प्रेन्युयर फार्मर प्रोडुसर कंपनी लि. हिवरखेड,मोर्शी अमरावती | ३६२.६९ | २१७.६२ |
| ३८) | अमरावती | ॲग्रीकोर फार्मर प्रो.कं.लि. बाभळी, ता. दर्यापूर, अमरावती | २८४.२९ | १७०.५७ |
| ३९) | नागपूर | वाकोडी फार्मर प्रो.कं. लि., ता.सावणेर जि. नागपूर | ८५.२४ | ५१.१४ |
| ४०) | नागपूर | मांढळ ॲग्रो प्रोडक्ट फार्मर प्रो.कं. लि., मांढळ, ता.कुही, जि. नागपूर | १५२.०९ | ९१.२६ |
| ४१) | गडचिरोली | ग्रीनगोंडवना फार्मर प्रो.कं. लि., पो. शिवनी ता आरमोरी जि गडचिरोली | ८४.७१ | ५२.४२ |
| ४२) | चंद्रपूर | चंद्रपूर ॲग्री प्रोसेसर्स प्रो कं लि. ता.नागभीड जि. चंद्रपूर | १५७.४९ | ९४.४९ |

२) प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा :- VSTF.

उपप्रकल्प मंजूर असलेल्या संस्थाची नावे :-

| अ क्र. | जिल्हा | सीबीओचे नाव | समितीने मंजूर केलेली प्रकल्प किंमत (रु.लाखात) | समितीने मंजूर केलेले अनुदान (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | लातूर | देवणी ॲग्रो फार्मर प्रो कं लि. ता.देवणी जि. लातूर | २८६.४२ | १७१.८५ |
| २ | नांदेड | नागरधारी ॲग्रो शे उ कंपनी, हिमायतनगर नांदेड | १०९.८९ | ६५.९४ |
| ३ | सोलापूर | राजलक्ष्मी ॲग्रीटेक प्रो कं. लि. मंगळवेढा जि सोलापूर | ४९८.०६ | २९८.८४ |

३) प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा :- MSRLM

उपप्रकल्प मंजूर असलेल्या संस्थाची नावे :-

| अ क्र. | जिल्हा | सीबीओचे नाव | समितीने मंजूर केलेली प्रकल्प किंमत (रु.लाखात) | समितीने मंजूर केलेले अनुदान (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | सक्षम महिला प्रभागसंघ, मु.पो. कमलापूर ता. सांगोला जि. सोलापूर | ५६.३५ | ३३.८१ |

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत मा. प्रकल्प संचालक,स्मार्ट यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीची बैठक क्र.१५ दि.२७/०६/२०२३ रोजी स्मार्ट कार्यालय, पुणे येथे संपन्न झालेली आहे. सदर बैठकीस प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे.
सदर बैठकीमध्ये झालेली चर्चा व त्याअनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे :

विषय क्र.१: समुदाय आधारीत संस्था (सीबीओ) यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) यांना संबंधीत पीआययू यांच्या शिफारशीप्रमाणे मंजूरी देणेबाबत...

प्रकल्प अंगलवजावणी कक्षाचे प्रमुख यांच्या स्वाक्षरीने शिफारस केलेल्या समुदाय आधारीत संस्थांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे सदर बैठकीत संक्षिप्त सादरीकरण करण्यात आले. बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या व समितीने मंजूरी दिलेल्या उपप्रकल्पाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पीआययू | SPAC १,५,६,७,८,९,१०,११,१२ व १३ नुसार मंजुरी दिलेल्या FPP ची संख्या | SPAC १५ समितीमध्ये मंजुरी दिलेल्या FPP संख्या | एकुण मंजुर FPP संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि | ४६५ | २४ | ४८९ |
| २ | व्हीएसटीएफ | २६ | २ | २८ |
| ३ | माविम | ५१ | ० | ५१ |
| ४ | MSRLM | २० | ८ | २८ |
| ५ | पशुसंवर्धन | ११ | ० | ११ |
| एकूण | | ५७३ | ३४ | ६०७ |

प्रकल्प अंमलबजावणी कक्षनिहाय उपप्रकल्पांना खालील अटी शर्तीच्या अधीन राहून मंजूरी दिलेल्या समुदाय आधारित संस्थांची यादी पुढीलप्रमाणे आहे. तसेच समुदाय आधारीत संस्थानिहाय मंजूर FPP तपशील इतिवृत्तासोबतच्या प्रपत्र १ मध्ये सादर केलेला आहे.

Additional Project Director
of Maharashtras Agribusiness &
Rural Transformation, SMART Society

| अ.क्र. | सीबीओ नाव व पत्ता | जिल्हा | प्रस्तावित उपप्रकल्प किंमत (रु. लाख) | शासकीय मापदंडानुसार ग्राह्य धरलेली रक्कम (रु. लाख) | मंजूर अनुदानाची रक्कम (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|
| पीआययू, कृषि | | | | | |
| १ | कृषितरंग अग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. मु.पो वर्हाने, ता. मालेगाव जि. नाशिक | नाशिक | २३४.८६ | १८९.८४ | ११३.९० |
| २ | सेंद्रिय शेतकरी मित्र अग्रो प्रोड्युसर कंपनी, मुरंबी, इगतपुरी, नाशिक | नाशिक | १०५.४० | ९२.९६ | ५५.७८ |
| ३ | सर्वज्ञ फार्मर प्रोड्युसर कं.लि. नांदखुर्द, ता. एरंडोल, जि जळगाव | जळगाव | २६६.२९ | २६२.९६ | १५७.७८ |
| ४ | तोरणा अग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. वंगण वाडी तालुका वेल्हा,जिल्हा पुणे | पुणे | २३५.५४ | १८५.८३ | १११.५० |
| ५ | कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि,ता.पैठण जि.औरंगाबाद | औरंगाबाद | ५४४.६४ | ४४४.१० | २६६.४६ |
| ६ | पाथरवाडी अग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, भंडारवाडी, ता. रेणापूर, जि. लातूर | लातूर | २७१.६९ | २५२.४७ | १५१.४८ |
| ७ | अक्का ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड जि.लातूर | लातूर | ३०४.१४ | २५२.३३ | १५१.४० |
| ८ | पवनराजे अग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी, जि.उस्मानाबाद | उस्मानाबाद | १९२.२० | १५०.२१ | ९०.१३ |
| ९ | अजिंक्य अग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. वाशी ता. वाशी, जि.उस्मानाबाद | उस्मानाबाद | ३६७.७१ | ३८१.५४ | २२८.९२ |
| १० | देवदया अग्रो फार्म प्रोड्युसर कंपनी लि. मु. पो. कातनेश्वर, तालुका - पुर्णा, जिल्हा- परभणी | परभणी | ३६२.४७ | ३०३.८९ | १८२.३३ |
| ११ | मल्हारी अग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. जिंतूर, जि. परभणी | परभणी | ३३५.४१ | २८३.५१ | १७०.११ |
| १२ | बुलढाणा अमृत फार्मर्स प्रोड्युसर कंपनी,नंद्रकोळी ता.जि-बुलढाणा | बुलढाणा | ३३२.८४ | ३३४.४४ | २००.०० |
| १३ | ग्रामपुत्र जैविक शेती मिशन फार्मर प्रोड्युसर कंपनी लि ,मुर्तीजापुर ,ता.मुर्तीजापुर,जि.अकोला | अकोला | २९८.१८ | ३०३.२८ | १८१.९७ |
| १४ | कृपी बीज फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. कान्हेरी सरप, ता. बार्शी टाकळी, जिल्हा अकोला | अकोला | १९१.६५ | १९९.६३ | ११९.७८ |
| १५ | वानव्हॅली जैविक फ्रुट,वेजिटेबल व हर्ब्ज प्रोड्युसर कंपनी लि,तेल्हारा,जि-अकोला | अकोला | ५०५.८७ | ४६६.९४ | २८०.१६ |
| १६ | काशश्री फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे,जिल्हा अमरावती | अमरावती | २७७.६३ | २८९.७८ | १७३.८७ |
| १७ | इकोफ्रेंडली ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि, अंजनगाव, जि-अमरावती | अमरावती | ६२.४८ | ६१.६९ | ३७.०१ |



Additional Project Director
State of Maharashtras Agribusiness & Rural Transformation, SMART Society

| अ.क्र. | सीवीओ नाव व पत्ता | जिल्हा | प्रस्तावित उपप्रकल्प किंमत (रु. लाख) | शासकीय मापदंडानुसार ग्राह्य धरलेली रक्कम (रु. लाख) | मंजूर अनुदानाची रक्कम (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १८ | भिवसन पेंच फार्मर प्रोड्युसर कंपनी लि ,ता.पारशिवनी,जि.नागपूर | नागपूर | ५१५.६६ | ४०९.२८ | २४५.५७ |
| १९ | वर्धा बनाना प्रोड्युसर कंपनी लि.ता.सेलू जि.वर्धा | वर्धा | ३२०.३२ | ३३२.५६ | १९९.५३ |
| २० | हमदापुर तेजस्वी युमन फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.हमदापुर ता.सेलु जि.वर्धा | वर्धा | ५०.७३ | ५२.१७ | ३१.३० |
| २१ | स्वामिनी महिला कृषक शेतकरी प्रोड्युसर कंपनी लि.पावरीटोला ता.व जि.गोंदिया. | गोंदिया | ३२७.४२ | ३०९.१९ | १८५.५२ |
| २२ | अदासी किसान प्रोड्युसर कं.लि.अदासी ता.गोंदिया, जि.गोंदिया | गोंदिया | १६५.१० | १३५.२५ | ८१.१५ |
| २३ | साखरवाही फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि., साखरवाही, ता. जि. चंद्रपूर | चंद्रपूर | ५२२.९५ | ४५९.७९ | २७५.८७ |
| २४ | चंद्रपुर गडचिरोली फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड ता.सावली जि.चंद्रपुर | चंद्रपूर | ३२४.०२ | ३२७.९५ | १९६.७७ |
| PIU - VSTF | | | | | |
| १ | कृषीचंद्रमा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि.ममदापूर ता. अंबाजोगाई जि.बीड | बीड | ३३८.९९ | ३३४.१५ | २००.०० |
| २ | वरदविनायक ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. जि.उस्मानाबाद | उस्मानाबाद | ३८४.२३ | ३४४.२५ | २००.०० |
| PIU - MSRLM | | | | | |
| १ | क्रॉप क्विन महिला फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. तुर्काबाद ,गंगापूर ,जि. औरंगाबाद | औरंगाबाद | ४३.२४ | ४३.८५ | २६.३१ |
| २ | सहवास महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी | औरंगाबाद | ४७.७८ | ४८.२५ | २८.९५ |
| ३ | उमेदराखी महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी | बीड | ४१.५३ | ४०.९१ | २४.५५ |
| ४ | धारासूरमर्दिनी महिला फार्मर प्रोड्युसर कं. | उस्मानाबाद | ४६.४२ | ४३.४६ | २६.०८ |
| ५ | शमीपत्र अग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी | वर्धा | ४६.८३ | ४५.५४ | २७.३२ |
| ६ | मौदा संघर्ष महिला फार्मर प्रोड्युसर कं. | नागपूर | ५२.३१ | ५३.०१ | ३१.८० |
| ७ | शिखरधारा शेतकरी प्रोड्युसर कंपनी | भंडारा | ४८.८४ | ४५.४८ | २७.२९ |
| ८ | धरतीआबा महिला फार्मर प्रोड्युसर कंपनी | चंद्रपूर | ४५.६९ | ४५.०७ | २७.०४ |

उपरोक्त संस्थांच्या उपप्रकल्पांना खालील अटी व शर्तीनुसार समितीमध्ये सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

i. समुदाय आधारित संस्थेकडील १) मार्केटेबल सरप्लस २) खरेदीदाराशी व्यक्तीशः बोलून कराराबाबतची खात्री याबाबत पीआययू, कृषिच्या उपप्रकल्पांसाठी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी आणि अन्य पीआययूंनी त्यांच्या अधिकाऱ्यांमार्फत सत्यता तपासावी.

Additional Project Director
State of Maharashtras Agribusiness & Rural Transformation, SMART Society

ii. उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले प्रक्रीया युनीटसाठीचे शेड तसेच मशीनरीसाठीचे शेड / बांधकामाची आवश्यकता व क्षमतेची तपासणी पीआययु, कृषि बाबत RIU नी करावी आणि अन्य पीआययू बाबत पीआययू स्तरावरुन निश्चित केलेल्या अधिकाऱ्यांकडून करावी. यासाठी पीआययू, कृषि अंतर्गत RIU कक्षातील उपलब्ध अभियंत्याच्या सेवा मागणीनुसार इतर पीआययू यांनाही उपलब्ध करुन देण्यात याव्यात. शेड / बांधकाम घटकाची आवश्यकता व क्षमता निश्चित झाल्यानंतर SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मूल्यांकनाच्या अटीवर सदर घटक मान्य करण्यात येत आहेत. सीबीओने प्रकल्पामध्ये अनावश्यक क्षमतेचे शेड / बांधकाम केल्यास आवश्यक तेवढ्याच क्षमतेच्या शेड / बांधकामाचे मूल्यांकन करुन त्यानुसार अनुदान देण्यात येईल. अनावश्यक शेड / बांधकामास अनुदान देय राहणार नाही. तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे मुल्यांकन करुनच अनुदान वितरीत करण्यात येईल.

iii. उपप्रकल्पाची / व्यवसायाची अंमलबजावणी करताना आवश्यक खेळते भांडवल (Working Capital) तसेच दैनंदिन कार्यान्वयन खर्च (Day to Day Operational Expenditure) यासाठी सीबीओ स्वत: जबाबदार राहतील, यासाठी प्रकल्पातून कोणतेही अनुदान देय राहणार नाही, हे सर्व सीबीओंना PIU कृषि यांनी DIU स्तरावरुन / इतर PIU यांनी जिल्हास्तरावरुन लेखी अवगत करण्यात यावे.

iv. सीबीओने प्रस्तावित केलेल्या उपप्रकल्पात धान्य तथा उत्पादने साठवणुकीसाठी स्वतंत्र गोदामाची मागणी नसल्यास अशा बाबतीत कच्चा व पक्का माल साठवणुक विचारात घेवून प्रक्रिया शेड हे मागणी नुसार मशीनरी किंमतीपेक्षा जास्त देय राहील.

v. मंजूर उपप्रकल्पातील सीबीओंना अनुदान वितरण करताना सीबीओच्या मंजूर प्रकल्प किंमतीच्या ५ % Paid Up Capital जमा झाल्याची संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेने खात्री करूनच अनुदान वितरीत करावे.

vi. पीआययू, MSRLM व माविम यांनी मंजूर उपप्रकल्पातील सीबीओंना अनुदान वितरीत करताना सीबीओच्या मंजूर प्रकल्पासाठी आवश्यक जागेचा २९ वर्षाचा नोंदणीकृत भाडेकरार अथवा जागा स्वत:ची असल्याची खात्री करूनच अनुदान वितरीत करावे.

vii. राज्यस्तरीय समितीने यापूर्वी माविम, MSRLM व पशुसंवर्धन या पीआययूंच्या सीबीओंच्या प्रस्तावित उपप्रकल्पातील वाहन या घटकास मंजूरी दिलेली आहे. त्यानुषंगाने कृषि विभागांतर्गतच्या १०० टक्के महिला भागधारक असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांनी देखील वाहन प्रस्तावित केलेले असल्यास त्यास मंजूरी देण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

viii. उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास व शासकीय मापदंड उपलब्ध नसल्यास प्रत्यक्ष किंमतीच्या ६०% VGF अनुदान देय राहील. तथापि सदर घटकाची खरेदी स्पर्धात्मक व पारदर्शकपणे करणे अनिवार्य राहील.

ix. ज्या शासकीय मापदंडात जीएसटीचा समावेश नाही अशा बाबतीत GST पोटी होणाऱ्या खर्चाच्या (मापदंडाप्रमाणे ग्राह्य किंमतीच्या प्रमाणात) ६०% अनुदान अनुज्ञेय राहील.

x. स्मार्ट सोसायटीच्या पाचव्या नियामक मंडळाच्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे मंजूर उपप्रकल्पातील यंत्रसामुग्री, मशीनरी या घटकांना ज्या योजनेच्या मापदंडानुसार मंजूरी दिलेली आहे, त्यातील बाबी/उपघटक नमुद करुन सीबीओ स्तरावर संपादन करताना यांत्रिकी अभियंता किंवा समतुल्य



A. ditional Project Director
State of Maharashtras Agribusiness &
Rural Transformation, SMART Society

अभियंत्यामार्फत (पदवीका / पदवीधारक) यंत्रसामुग्री, मशीनरीचे स्पेशिफीकेशन निर्धारीत करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

xi. उपप्रकल्पासाठी कार्यान्वयन खर्च (Operative Expenditure) एकूण शासकीय मापदंडानुसार ग्राह्य धरलेल्या रक्कमेच्या ५% पर्यंत अधिकतम रुपये २०.०० लाखाच्या मर्यादेत मंजूर करण्यात येईल. तथापि हा खर्च ही ६०:४० प्रमाणात म्हणजे ६०% अनुदान व ४०% समुदाय आधारीत संस्थेचा स्व:हिस्सा याप्रमाणे राहील. आकस्मिक खर्चामध्ये उपप्रकल्पासाठी जागेच्या नोंदणीकृत भाडे करारासाठी आलेला खर्च, उपप्रकल्पासाठी प्रस्तावित घटकासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा खर्च, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आलेला खर्च, संपादन प्रक्रियेसाठी मशिनरी/ यंत्र सामग्री स्पेशिफीकेशन तयार करण्यासाठी आलेला खर्च, शासकीय परवानगीसाठी भरण्यात आलेले विविध शुल्क/उपकर, आय.टी. उपकरणे, आवश्यक फर्निचर, स्मार्ट राज्यस्तरीय व विभागस्तरीय बैठकांसाठी खर्च, तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्थापक/लेखापाल नेमणूक तसेच अन्य आकस्मिक खर्च इ. बाबींचा समावेश आहे. आकस्मिक खर्च सुध्दा जागतिक बँकेच्या सीबीओ संपादन मार्गदर्शक सुचनांनुसार करणे अनिवार्य आहे.

xii. सीबीओमार्फत उभारावयाच्या पायाभुत सुविधाकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्धतेची खात्री पीआययूचे संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्याने केल्याशिवाय उपप्रकल्पाचे काम सुरु करु नये. प्रकल्प उभा राहीला आणि विद्युत पुरवठाच नाही अशी स्थिती होवू नये.

xiii. मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पातील घटकांसाठी अनुदानाची परिगणना शासकीय योजनांच्या सध्याच्या मापदंडाप्रमाणे ग्राह्य धरून उपप्रकल्प मंजूर केले आहेत. तथापि प्रकल्पाची उभारणी करण्यापूर्वी मापदंडात बदल झाल्यास त्या प्रमाणे अनुदानाची सुधारित परिगणना करून अनुदान देणेबाबतचा निर्णय प्रकल्पामार्फत घेण्यात येईल. हा निर्णय पूर्णतः प्रकल्पाचा राहील. तथापि, त्यासाठी फेर सुधारित प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

xiv. अंतिम मंजूर करण्यात आलेल्या सीबीओ जर बँक कर्ज घेणार असतील तर त्यांना कृषि पायाभुत सुविधा निधी (AIF) योजनेचा लाभ द्यावा.

xv. गोदाम घटक मंजूर केलेल्या सीबीओंना गोदाम WDRA Accrediated करणे अनिवार्य राहील.

xvi. मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पात प्रस्तावित केलेल्या मुल्य साखळी घटकांनुसार संबंधित सीबीओंना प्रशिक्षण देण्यात यावे.

xvii. राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीने प्रस्तावित उपप्रकल्प किंमतीनुसार खालीलप्रमाणे प्लॉस्टीक क्रेटस या बाबी करीता मंजूरीस मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | प्रकल्प किंमत | देय प्लॉस्टीक क्रेट संख्या |
|---|---|---|
| १ | रु.३.०० कोटी पर्यंत | १००० |
| २ | रु.३.०१ ते रु.४.०० कोटी पर्यंत | १५०० |
| ३ | रु.४.०१ कोटी पेक्षा जास्त | २००० |

xviii. प्रकल्पामार्फत सोलर पॉवर घटकाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित होईपर्यंत या घटकाची अंमलबजावणी करू नये.

xix. उप प्रकल्पातील व्यवसाय कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक सर्व परवाने / परवानगी /



Additional Project Director

नोंदणी घेण्याची जबाबदारी समुदाय आधारित संस्थांची राहील, असे पीआययु मार्फत सीबीओंना कळवावे.

xx. ज्या सीबीओंना अवजारे बँक (Custom Hiring Centre) मंजुर आहे. अशा सीबीओंनी अवजारे संपादनानंतर प्रत्येक अवजारावर स्मार्ट प्रकल्पातून अनुदान प्राप्त असे गोंदण (Embossing) करणे अनिवार्य आहे, असे संबंधित सीबीओंना कळविण्यात यावे.

xxi. पीआययू मार्फत सीबीओंना उपप्रकल्प मंजूरी आदेश निर्गमित होताच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून संबंधीत सीबीओंना संपादनाच्या वेळोवेळीच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रशिक्षण देऊन तात्काळ संपादन प्रक्रिया सुरु करावी.

xxii. स्मार्ट नियामक मंडळाच्या सहाव्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार कॉटन जिनिंग - प्रेसिंग उपप्रकल्पासाठी अनुदान ६० टक्के अधिकतम अनुदान मर्यादा रु.३.०० कोटी पर्यंत मंजुर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याप्रमाणे कॉटन जिनिंग - प्रेसिंग उपप्रकल्पांना मंजुरी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यापुर्वीचे मापदंडा अभावी विचाराधिन असलेल्या कॉटन जिनिंग - प्रेसिंग उपप्रकल्प सुधारीत मंजुरीसाठी सादर करण्यात यावे.

xxiii. या उपप्रकल्पांना समितीने मंजुरी दिली असली तरी FPP मंजुरीच्या सर्व निकषांची आणि उपरोक्त अटींची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी प्रकल्प राबविणाऱ्या संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची असेल आणि अशी पूर्तता संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेमार्फत ग्रॅन्ट अॅग्रीमेंट करण्यापूर्वी करणे आवश्यक आहे.

xxiv. उपप्रकल्प मंजूरीनंतर समुदाय आधारित संस्था व प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांनी करावयाच्या कार्यवाही बाबत स्मार्ट कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

विषय क्र.२ : SPAC १५ मध्ये त्रुटी आढळून आलेल्या सीबीओंनी पीआययु मार्फत करावयाच्या पुर्ततेबाबत :

SPAC १५ सभेमध्ये खालील ०३ सीबीओंच्या सविस्तर प्रकल्प अहवालांमध्ये त्रुटी आढळुन आलेलया आहेत. सदर, त्रुटी संबंधित सीबीओंना कळविण्यात याव्यात. त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर विहीत मार्गाने सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) मंजुरीसाठी शिफारस करण्यात यावा.

| अ. क्र. | पीआययु | जिल्हा | सीबीओचे नाव | त्रुटी |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि | उस्मानाबाद | विकासधारा अॅग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, लि. जाधववाडी ता. जि. उस्मानाबाद | सीबीओची आर्थिक उलाढाल रु. १२.७८ लक्ष असुन, जमा भागभांडवल रु. ५.०० लक्ष आहे. सीबीओने प्रस्तावित केलेल्या उपप्रकल्पाची रक्कम रु. ४५७.७८ लक्ष इतकी आहे. सदर सीबीओची प्रस्तावित उपप्रकल्प उभारण्याची आर्थिक क्षमता आहे का ? या विषयीची DIU, RIU व PIU यांचे कडुन माहिती घेऊन योग्य क्षमता असल्यास मान्यतेसाठी उपप्रकल्प फेर सादर करावा. |
| २ | | बुलढाणा | लक्ष्मीनारायण फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि., पिंप्री गवळी, | सीबीओची आर्थिक उलाढाल रु. ५.५१ लक्ष असुन, जमा भागभांडवल रु. ५.२० लक्ष आहे. सीबीओने प्रस्तावित केलेल्या उपप्रकल्पाची रक्कम रु. |



Additional Project Director
... of Maharashtras Agribusiness & Rural Transformation, SMART Society

| अ. क्र. | पीआययु | जिल्हा | सीबीओचे नाव | त्रुटी |
|---|---|---|---|---|
| | | | ता.खामगाव, जि.बुलढाणा | ३२६.९० लक्ष इतकी आहे. सदर सीबीओची प्रस्तावित उपप्रकल्प उभारण्याची आर्थिक क्षमता आहे का ? या विषयीची DIU, RIU व PIU यांचे कडुन माहिती घेऊन योग्य क्षमता असल्यास मान्यतेसाठी उपप्रकल्प फेर सादर करावा. |
| ३ | MSRLM | गडचिरोली | चातगाव नारीशक्ती FPC, ता. धानोरा जि. गडचिरोली | धान्य साठवणुकीसाठी शेड २६७.०४ चौ.मी. किंमत रु. ५९.४० लक्षची मागणी केलेली आहे. तथापि, शास्त्रशुध्द साठवणुकीसाठी शेड ऐवजी गोदामाची मागणी करावी. त्याअनुषंगाने शेड ऐवजी गोदामाचे सविस्तर अंदाजपत्रक सादर करावे. |

विषय क्र.३ : पूर्वीच्या मंजुर अनुदानापेक्षा वाढीव मागणी नसल्याने म्हणजेच अतिरिक्त बोजा निर्माण होत नसलेल्या उपप्रकल्पांना (FPP) तसेच यापुर्वी फक्त मशीनरी मंजुर केलेल्या परंतु बांधकाम मंजुर न केलेल्या उपप्रकल्पास सुधारीत मंजुरी देणेबाबत...

विभाग प्रमुख, पीआययु, व्हीएसटीएफ यांचे पत्र क्र. पीआययु व्हीएसटीएफ / एफपीपी /१३१/२०२३ दि.२५.०४.२०२३ व सम क्रमांकाचे पत्र क्र. १३१-अ, दि. २५.०४.२०२३ अन्वये यापूर्वीच्या मंजूर उप प्रकल्पाच्या एकूण अनुदानात व सुधारित अनुदानात वाढ नसल्याने खालील २ सीबीओंच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

१)कर्मकुशलता फार्मर प्रो कं लि, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

२)राजलक्ष्मी अॅग्रीटेक प्रो. कं. लि. ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

विभाग प्रमुख, पीआययु, कृषि यांचे पत्र क्र. १३५३ दि.२४.०३.२०२३, व पत्र क्र. १९४१ दि.१९.०६.२०२३ अन्वये खालील २ सीबीओंच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

१) मंगलदास अॅग्रो प्रो.कं.लि., ता. अक्कलकोट, जि. सोलापूर ( यापूर्वीचे क्लिनींग ग्रेडींग व कंम्बाइन मल्टीग्रेन हार्वेस्टर घटक वगळुन नव्याने Colour Sorter व Compressor मंजुरीस शिफारस आहे. अनुदानात घट-रु.०.०८ लक्ष)

२) वेंगुर्ला प्रोड्युसर.कं.लि.मु.पो. मठ ता. वेंगुर्ला. जि. सिंधुदुर्ग (APEDA Accredited Integrated Pack House for Mango Export संबंधित मशिनरी मंजुर केलेल्या आहेत. तथापि, यासाठी आवश्यक बांधकाम मंजुर केलेले नव्हते. SSR प्रमाणे बांधकाम मंजुरीमुळे अनुदान रक्कमेत रु. ४३.५० लक्ष वाढ होत आहे.)

विभाग प्रमुख, पीआययु, माविम यांचे पत्र क्र. ५३७ दि.२९.०३.२०२३, अन्वये खालील १ सीबीओंच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

१) संघर्ष सीएमआरसी, ता. बारामती, जि. पुणे ( शेडच्या बांधकाम अनुदान रक्कमेत व कार्यान्वयीन / आकस्मिक खर्चात रु.८.४७ लक्ष घट झालेली आहे.)

उपरोक्त प्रमाणे सोबतच्या प्रपत्र-२ नुसार पाच सीबीओंच्या उपप्रकल्पांना सुधारीत मंजुरी देण्यात आलेली आहे.



Additional Project Director
State ... Agribusiness &
Rural ... SMART Society

विषय क्र.४ : मंजूर उपप्रकल्प / FPP रद्द करणे बाबत...

पीआययू, कृषि यांच्या शिफारशीनुसार (पत्र क्र.१८१६ दि.३१.०५.२०२३ व पत्र क्र.१९५४ दि. २०.०६.२०२३) खालील समुदाय आधारीत संस्थांना मंजूर केलेले उपप्रकल्प / सविस्तर प्रकल्प अहवाल रद्द करण्यात येत आहेत.

१. मत्स्योदरी अॅग्रो प्रोडयुसर कंपनी लि,पिंपरखेड खुर्द,ता/जि- जालना
२. जामुवंत अॅग्रो प्रोडयुसर कंपनी लि., ता. अंबड जि. जालना
३. श्रीकृष्ण फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लि., ब्राम्हणी जि. नागपूर
४. साई प्रवरा शेतकरी उत्पादक कंपनी, लि., चिंचोली, ता. राहुरी, जि. अहमदनगर

पीआययू, MSRLM यांच्या शिफारशीनुसार (पत्र क्र. १६८९ दि. २४.०५.२०२३) खालील समुदाय आधारीत संस्थांना मंजूर केलेले उपप्रकल्प / सविस्तर प्रकल्प अहवाल रद्द करण्यात येत आहेत.

१. तुळजापूर सीएलबीसी, जि. उस्मानाबाद
२. मराठवाडा पशुउन्नती संसाधन केंद्र,सीएलबीसी, जि. उस्मानाबाद

विषय क्र.५: सीबीओच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (FPP) / उपप्रकल्पास अंतिम मंजुरी दिल्यानंतर १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही प्रथम अनुदान हप्ता मागणी न केलेल्या सीबीओंची अंतिम मान्यता रद्द करणेबाबत...

पीआययु कृषि, माविम व VSTF यांनी ज्या सीबीओंच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (FPP) / उपप्रकल्पास अंतिम मंजुरी दिल्यानंतर १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही प्रथम अनुदान हप्ता मागणी केलेली नाही अशा सीबीओंना नोटीस देण्यात यावी. नोटीसीमध्ये एक महिन्याच्या आत सदर सीबीओंनी प्रथम अनुदान हप्ता मागणी सादर न केल्यास त्यांची अंतिम मान्यता रद्द करण्यात येईल असे स्पष्टपणे नमुद करावे. या कालावधीनंतरही अनुदान मागणी प्राप्त न झाल्यास अशा सीबीओंची अंतिम मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(कौस्तुभ दिवेगावकर भा.प्र.से.)
प्रकल्प संचालक,स्मार्ट,पुणे

---

जा. क्र. स्मार्ट / SPAC-१५ / इतिवृत्त / 1210 /२०२३, दि. 06/०७/२०२३

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) सर्व विभाग प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, स्मार्ट
२) सर्व नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, स्मार्ट
३) सर्व तज्ञ, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष,स्मार्ट

२) उपप्रकल्पाचे नाव :- राजलक्ष्मी ॲग्रीटेक प्रोड्युसर कं. लि. मंगळवेढा जि सोलापूर

उपप्रकल्प:- डाळिंब, सीताफळ, चिंच, लिंबू इ. संकलन, प्रतवारी, प्रक्रिया व विपणन

उपप्रकल्पात प्रस्तावित बाबी खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | तपशील | यापूर्वीची मंजुरी | | | सुधारीत मागणी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपप्रकल्पात प्रस्तावित रक्कम (रु. लाख) | शासकीय मापदंडानुसार ग्राहय रक्कम (रु. लाख) | स्मार्ट अनुदान (रु. लाख) | सुधारीत घटकाची शासकीय मापदंडानुसार ग्राहय रक्कम (रु. लाख) | स्मार्ट अनुदान (रु. लाख) | शेरा |
| १ | Sanctioned Biomass operated Cold storage २०० MT<br>Revised Biomass operated Cold storage १०० MT | ७०.३० | ७०.३० | ४२.१८ | ७०.३० | ४२.१८ | पीआययु व्हीएसटीएफ यांचेव्दारे चुकीने १०० ऐवजी २०० मे.टन टंकलेखन झाले होते. सुधारीत दर पत्रकानुसार रक्कम रु. ८०.००लाख असली तरी पूर्वीच्याच मंजुर रक्कमेनुसार सुधारणेस मंजुरी देण्यात येत आहे. |
| २ | Food Processing Plant ७७५० Sq. Ft. | १३२.६२ | १२७.६८ | ७६.६१ | १२७.६८ | ७६.६१ | यापूर्वीचे मंजूर घटक कायम |
| ३ | Automatic Fruit Pulp Processing Plant २ TPH | ११६.९७ | १०४ | ६२.४ | १०४ | ६२.४ | |
| ४ | Automatic PET Bottle packaging Line with Pre-processing section २००० LPH | ९६.२१ | ९६.२१ | ५७.७२ | ९६.२१ | ५७.७२ | |

A... Project Director
Sta... Maharashtra Agribusiness & Rural Transformation, SMART Society

| अ.क्र. | तपशील | यापूर्वीची मंजुरी | | | सुधारीत मागणी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपप्रकल्पात प्रस्तावित रक्कम (रु. लाख) | शासकीय मापदंडानुसार ग्राहय रक्कम (रु. लाख) | स्मार्ट अनुदान (रु. लाख) | सुधारीत घटकाची शासकीय मापदंडानुसार ग्राहय रक्कम (रु. | स्मार्ट अनुदान (रु. लाख) | शेरा |
| ५ | Automatic Custard Apple Processing Plant २०० KG . HR | २१.१७ | २१.१७ | १२.७ | २१.१७ | १२.७ | यापूर्वीचे मंजूर घटक कायम |
| ६ | Blast Freezer १० * १०* १० HT (८.३२ MT.) | १३.११ | १३.११ | ७.८६ | १३.११ | ७.८६ | |
| ७ | Transformer ३२० KVA | ६.९० | ४.४८ | २.६९ | ४.४८ | २.६९ | |
| ८ | DG Set ३२० KVA | १८.५५ | १८.४५ | ११.०७ | १८.४५ | ११.०७ | |
| ९ | Boiler १ T/Hr | १६.२ | १६.२ | ९.७२ | १६.२ | ९.७२ | |
| १० | Compressor २० HP | २.७० | २.५० | १.५० | २.५० | १.५० | |
| ११ | RO Plant ३००० LPH | ३.९६ | ३.९६ | २.३७ | ३.९६ | २.३७ | |
| | एकुण | ४९८.६९ | ४७८.०६ | २८६.८३ | ४७८.०६ | २८६.८४ | |
| १० | ५% Operative Expenditure | | २०.०० | १२.०० | २०.०० | १२.०० | |
| | एकुण एकंदर | | ४९८.०६ | २९८.८३ | ४९८.०६ | २९८.८४ | |

टिप : यापूर्वीच्या मंजूर उप प्रकल्पाच्या एकूण रक्कमेत व सुधारित रक्कमेत फरक नाही.

Additional Project Director
State of Maharashtras Agribusiness & Rural Transformation, SMART Society

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ 39AA 219814

13 MAR 2023

विक्री क्रं. ४९४३४ दिनांक ____

श्री. ____

हस्ते RAJLAXMI AGRITECH PRODUCER COMPANY LIMITED

यांनी Gat No. 97/1/A, Radde Road, Mangalwedha,

Solapur, Radde, Pin Code - 413322

व त्याचे ____

असे एकुण ____

SUB TREASURY OFFICE ★ MANGALVEDHA ★

28 FEB 2023

उपकोषागार अधिकारी

मंगळवेढा

श्री.रविंद्र शंकर शिंदे

मुद्रांक विक्रेता

तहसिल ऑफिस मंगळवेढा, जि.सोलापूर

परवाना क्र. १८/२७ कोड नं.२५०७००१

## AGREEMENT (LOAN CASE)

This AGREEMENT is made and executed at Solapur, Solapur on 5th day of March, 2023

**BETWEEN**

Hon.Balasaheb Thackeray State of Maharashtra's Agribusiness and Rural Transformation Project (SMART), a World Bank assisted project

SMART Project Implementation Unit ★ VSTF

RAJLAXMI AGRITECH PRODUCER COMPANY LIMITED ★ CIN: U01409PN2022PTC209020

INDIAN BANK ★ इंडियन बैंक ★ ओल्ड एम्प्लॉयमेंट चौक ★ Solapur Main S021 ★ Old Employment Chowk ★ इलाहाबाद ★ ALLAHABAD

under the Government of Maharashtra
Through
The Head/Nodal Officer/Authorized Signatory,
**Project Implementation Unit** (PIU),
**Village Social Transformation Foundation**
Having its office at Gram Vikas Bhavan,Plot No.76A,Sector 21 Kharghar,Navi Mumbai - 410210
which expression shall, unless the repugnant to
the context or meaning thereof, mean and include its successors and assigns)

**PARTY OF THE FIRST PART.**

**AND**

M/s Rajlaxmi Agritech Producer Company Limited
PAN : AALCR6833Q
Through its Authorised Signatory
Mr. Kiran Somanna Sangolkar
Age : 32 Occu.:Farmer
R/o : 97/1/A Radde Road, Tal-Mangalwedha Dist Solapur
PAN : DTKPS3957N
ADHAR NO.: 232727658053

hereinafter mentioned as'**CBO**, (which expression shall unless excluded by or repugnant to the subject or context thereof be deemed to include its successors in office and assigns) as authorized by Resolution dated __________

**PARTY OF THE SECOND PART.**

**AND**

Indian Bank'
(constituted under the
Banking Companies (Acquisition and
Transfer of Undertakings) Act 1970,)
having its Head Office at
No.66, Rajaji Salai,
Chennai (Madras) TamilNadu Pin 600001
and its Branch office at –
Employement Chowk Solapur
which expression shall, unless the repugnant to
the context or meaning thereof, mean and include its successors and assigns)

**PARTY OF THE THIRD PART.**

**WHEREAS**

**About PARTY OF THE FIRST PART 'SMART'**

01. Government of Maharashtra is implementing the State of Maharashtra's Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. This World Bank

funded project proposes to support the development of inclusive and competitive agriculture value chains, focusing on small holder farmers and agri-entrepreneurs in Maharashtra.

This would be achieved by expanding access to new and organized markets for producers and enterprises with complementary investments in technical services and risk management capabilities through the productive partnership scheme and market access plan. The SMART Project intends to provide business development grants to the business proposals (VGF upto 60%) to the target beneficiaries of the project i.e.Community Based Organizations (CBOs), which includes Farmer Producer Organizations (FPO), Primary Agriculture Cooperative Societies (PACS), Cluster Level Federations (CLFs) and Community Managed Resource Centres (CMRCs).

02. This agreement between the SMART Project, CBO andBank will govern the funding ratio and release of tranches for execution of the sub-project.

03. The project grants provided under this Agreement shall be used only in respect of the sub project objectives as per the conditions stipulated by the concerned State Project Approval Committee (SPAC) and as per terms and conditions laid down in the FPP Sanction letter.

**WHEREAS**

Pursuant to this Agreement, the Parties involved in this Agreement, are hereby covenant, agreed with the following obligations, terms & and conditions as stated herein below.

**A) TERMS & CONDITIONS WITH RESPECT OF EXECUTION OF THE SUB-PROJECT:-**

01. The total amount of the sub-project cost is **Rs.498.06** Lakh (in words) **Four Crore Ninty Eight Lakh Six Tousand Rs Only** and the breakdown of contributions is listed below:

**(Rs. Lakh)**

| Sr No. | CBO's Subproject Components | Cost Total | SMART Grant | CBO Equity |
|---|---|---|---|---|
| A) | Core Investments in Subproject | | | |
| 1) | Biomass Operated Cold Storage | 70.30 | 42.18 | 28.12 |
| 2) | Food Processing Plant | 127.68 | 76.61 | 51.07 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3) | Automatic Fruit Pulp Processing Plant 2 TPH | 104.00 | 62.4 | 41.6 |
| 4) | Automatic PET Bottle packaging Line with Pre-processing section 2000 LPH | 96.21 | 57.73 | 38.48 |
| 5) | Automatic Custard Apple Processing Plant 200 KG . HR | 21.17 | 12.70 | 8.47 |
| 6) | Blast Freezer 10 * 10* 10 HT (8.32 MT.) | 13.11 | 7.866 | 5.244 |
| 7) | Transformer 320 KVA | 4.48 | 2.69 | 1.79 |
| 8) | DG Set 320 KVA | 18.45 | 11.07 | 7.38 |
| 9) | Boiler 1 T/Hr | 16.20 | 9.72 | 6.48 |
| 10) | Compressor 20 HP | 2.50 | 1.50 | 1.00 |
| 11) | RO Plant 3000 LPH | 3.96 | 2.376 | 1.584 |
| | **Sub-Total (A)** | **478.06** | **286.84** | **191.22** |
| B) | Operative / Preliminary Expenses | 20.00 | 12.00 | 8.00 |
| | **Sub-Total (B)** | **20.00** | **12.00** | **8.00** |
| | **Total (A+B)** | **498.06** | **298.84** | **199.22** |

**Note**:Extension activities i.e.Value Chain Development School-VCDS will not bepart of the sub-project proposal.

02. This Agreement constitutes the sole and entire Agreement between all the parties. There will be no oral or written agreements, understandings, representations, or commitments of any kind, express or implied, not expressly set out in this Agreement.

**B) THE RESPONSIBILITIES OF PARTY OF THE FIRST PART HEREINAFTER REFERRED TO AS 'PROJECT')**

01. The Project will provide grants to the CBO of in the form of VGF(Subsidy/Grants)upto 60% of project cost. The subsidy is calculated in the sanction order of sub-project and that will be applicable, which is **Rs.298.84 Lakh**(Words in Rupees – **Two Crore Ninty Eight Lakh**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**
**(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)**
**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, व्हीएसटीएफ**

**वाचा :-**१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. कृव्यप्र/४६१९/ प्रक्र. ७०/८- अे दि. ११/०९/२०१९
२) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती ९ वी सभा दि.०४.१०.२०२२ चे इतिवृत्त.

---

## मूल्यसाखळी उपप्रकल्प मंजूरी आदेश

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे.
संदर्भ क्र.२ अन्वये, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीची ९ वी सभा संपन्न झाली.

उपरोक्त संदर्भीय सभेतील निर्णयानुसार **राजलक्ष्मी ॲग्रीटेक प्रो. कं.लि ., ता. मंगळवेढा जि. सोलापूर** यांच्या **डाळिंब, सीताफळ, चिंच, लिंबू इ. संकलन, प्रतवारी, प्रक्रिया करून खरेदीदारास विक्री करणे** या उपप्रकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

**सदर उपप्रकल्पातील घटक निहाय समितीने शासकीय मापदंडानुसार ग्राह्य केलेली रक्कम व स्मार्ट प्रकल्पातून देय अनुदान इ. बाबींचा तपशील खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | तपशील | सीबीओ प्रस्तावित उपप्रकल्प रक्कम (रु. लाख) | समितीने शासकीय मापदंडानुसार ग्राहय धरलेली रक्कम (रु. लाख) | समितीने मापदंडानुसार मंजूर केलेले अनुदान (रु. लाख) | मापदंडाची योजना |
|---|---|---|---|---|---|
| अ. | बांधकाम | | | | |
| १ | Biomass operated Cold storage २०० MT | ७०.३० | ७०.३० | ४२.१८ | Ministry of New & Renewable Energy capacity :- ५ to१० Mt, Cost Norm : - ५ to ६ lakh Pro Rata Basis |
| २ | Food Processing Plant ७७५० Sq. Ft. | १३२.६२ | १२७.६८ | ७६.६१ | आवश्यकता व क्षमतेची तपासणी आणि SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मुल्याकंनाच्या अटीवर मान्य |
| | **एकूण अ** | **२०२.९२** | **१९७.९८** | **११८.७९** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ब. | मशिनरी | | | | |
| १ | Automatic Fruit Pulp Processing Plant २ TPH | ११६.९७ | १०४.०० | ६२.४ | MoFPI F&V- L |
| २ | Automatic PET Bottle packaging Line with Pre-processing section २००० LPH | | | | |
| २.१ | Filter Press १००० Lph | १.८० | ९६.२१ | ५७.७२६ | MoFPI F&V- P |
| २.२ | PHE १००० Lph | २.२५ | | | |
| २.३ | Sugar Syrup Storage Tank (१००० Ltr) | १.६२ | | | |
| २.४ | Sugar Syrup Transfer Pump २००० Lph | ०.३६ | | | |
| २.५ | Pulp Dump Tank १००० Ltr | १.३५ | | | |
| २.६ | PS- Transfer Pump Screw Type | ०.९० | | | |
| २.७ | Blending Tank २००० Ltr | ४.५० | | | |
| २.८ | Transfer Pump To Homogenizer २००० Lph | ०.३६ | | | |
| २.९ | Homogenizer २००० Lph | ७.२० | | | |
| २.१० | Storage Tank with agitator २००० Lph | २.२५ | | | |
| २.११ | Juice Pasteurizer २००० Lph | ९.०० | | | |
| २.१२ | Filling Tank २००० Lph | ३.९६ | | | |
| २.१३ | Automatic Bottle Filling, CappingPlant Hot Juice (Packing Cap. २०० ml- २ lit) | २२.५० | | | |
| २.१४ | Cooling Tunnel | १०.८० | | | |
| २.१५ | CIP System for complete unit | १०.८० | | | |
| २.१६ | Ink Jet Printer | २.७० | | | |
| २.१७ | Slat Chain Conveyor | २.२५ | | | |
| २.१८ | Automatic Shrink Tunnel with Sleeve Wrapper | ४.५० | | | MoFPI F&V- P |
| २.१९ | PET Blow Machine with chiller and dryer | ७.११ | | | |
| | **Total** | **९६.२१** | **९६.२१** | **५७.७३** | |
| ३ | Automatic Custard Apple Processing Plant २०० KG . HR | २१.१७ | २१.१७ | १२.७० | MoFPI - Micro Food Processing Enterprises Scheme |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | Blast Freezer १० * १०* १० HT (८.३२ MT.) | १३.११ | १३.११ | ७.८६६ | MoFPI F&V A-३ |
| ५ | Transformer ३२० KVA | ६.९० | ४.४८ | २.६९ | MOFPI General Utilities D |
| ६ | DG Set ३२० KVA | १८.५५ | १८.४५ | ११.०७ | MOFPI General Utilities B |
| ७ | Boiler १ T/Hr | १६.२० | १६.२० | ९.७२ | MOFPI General Utilities A |
| ८ | Compressor २० HP | २.७० | २.५० | १.५० | MOFPI General Utilities K |
| ९ | RO Plant ३००० LPH | ३.९६ | ३.९६ | २.३७६ | MOFPI General Utilities H ४ |
| | **एकुण ब** | **२९५.७७** | **२८०.०८** | **१६८.०५** | |
| एकुण अ +ब | | ४९८.६९ | ४७८.०६ | २८६.८४ | |
| १० | ५% Operative Exp. | | २०.०० | १२.०० | |
| **एकुण एकंदर** | | | **४९८.०६** | **२९८.८४** | |

सदर उपप्रकल्पास सोबतच्या अटी व शर्तीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

**एकूण प्रकल्प किंमत:- रु. ४९८.०६ लाख**

**मंजूर अंतर व्यवहार्यता (VGF) निधी (अनुदान):- रु. २९८.८४ लाख**

**सोबत- अटी व शर्ती**



**मुख्य कार्यकारी अधिकारी -व्हीएसटीएफ**
**तथा प्रमुख प्रकल्प अंमलबजावणी कक्ष,**
**व्हीएसटीएफ - स्मार्ट प्रकल्प**

---

जा.क्र. स्मार्ट / पीआययु-व्हीएसटीएफ /मु.उ.मं.आ/ ३६ /२०२२ दिनांक. ३० /११/२०२२

**प्रति ,**

अध्यक्ष/संचालक, **राजलक्ष्मी ॲग्रीटेक प्रो. कं.लि ., ता. मंगळवेढा जि. सोलापूर**
उपप्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी सुरु करावी.

**प्रत :-**

१) मा. प्रकल्प संचालक स्मार्ट, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषी तथा प्रकल्प संचालक आत्मा सोलापूर यांना माहितीस्तव

३) जिल्हा कार्यकारी व्हीएसटीएफ तथा नोडल अधिकारी,जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सोलापूर सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व सनियंत्रण सोबतच्या अटी व शर्ती नुसार करण्यात यावे.

## उपप्रकल्प अंमलबजावणी अटी व शर्तीचे प्रपत्र

मंजुरी आदेश क्र जा.क्र. स्मार्ट / पीआययु-व्हीएसटीएफ /मु.उ.मं.आ/३६/२०२२ दिनांक. ३०/११/२०२२ अन्वये **राजलक्ष्मी ॲग्रीटेक प्रो. कं.लि ., ता. मंगळवेढा जि. सोलापूर** यांच्या डाळिंब, सीताफळ, चिंच, लिंबू इ. संकलन, प्रतवारी, प्रक्रिया करून खरेदीदारास विक्री करणे **या उत्पादक भागीदारी** उपप्रकल्पास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुरी देण्यात आलेली आहे.

१) समुदाय आधारित संस्थेकडील १) मार्केटेबल सरप्लस २) खरेदीदाराशी व्यक्तीशः बोलून कराराबाबतची खात्री याबाबत पीआययू, व्हीएसटीएफच्या उपप्रकल्पांसाठी जिल्हा कार्यकारी, व्हीएसटीएफ यांनी सत्यता तपासावी.

२) स्मार्ट प्रकल्पामध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना संबंधित संस्था जर यापूर्वी पोकरा व इतर योजनेचा लाभ घेतलेला असेल तर एकाच/त्याच बाबीसाठी/सुविधेसाठी पुन्हा स्मार्ट मधून अनुदानाची मागणी केलेली नाही याची खात्री पीआययू-व्हीएसटीएफ अंतर्गत जिल्हा कार्यकारी, व्हीएसटीएफ यांचे मार्फत करावी.

३) प्रस्तावित मुल्यसाखळी पुर्ण होण्यासाठी अन्य योजनेतील घेतलेले घटक अथवा सीबीओनी स्वतः उभारणी करणे अपेक्षीत असलेले घटक शक्यतो पुर्ण झालेले असावेत किंवा त्यांची उभारणी करणे सुरु झालेली असावी.

४) उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले प्रक्रीया युनीटसाठीचे शेड तसेच मशीनरीसाठीचे शेड बांधकामाची आवश्यकता व क्षमतेची तपासणी पीआययु, व्हीएसटीएफ मधील प्राधिकृत अधिकारी मार्फत तसेच स्मार्ट प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षातील सहयोगी स्थापत्य यांच्या मार्गदर्शनानुसार होईल. शेड /बांधकाम घटकाची आवश्यकता व क्षमता निश्चित झाल्यानंतर SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मुल्यांकनाच्या अटीवर सदर घटक मान्य करण्यात येत आहेत.सीबीओने अनावश्यक क्षमतेचे शेड/बांधकाम केल्यास आवश्यक तेवढयाच क्षमतेच्या शेड/बांधकामाचे मूल्यांकन करुन त्यानुसार अनुदान देण्यात येईल. अनावश्यक शेड/बांधकामास अनुदान देय राहणार नाही. तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे मुल्यांकन करुनच अनुदान वितरीत करण्यात येईल.

५) सीबीओंनी प्रस्तावित केलेली मशीनरी ही ISI अथवा त्या दर्जाची असावी. सीबीओंनी खरेदी केलेल्या मशीनरीचे स्पेसीफिकेशन व क्षमता त्रयस्त यंत्रणेकडून तपासून पीआययूंमार्फत अनुदान वितरणाची कार्यवाही केली जाईल. पीआययू मार्फत आवश्यकतेनुसार विभागनिहाय / जिल्हानिहाय त्रयस्त यंत्रणांची निवड केली जाईल. तसेच ज्या घटकांना ISI दर्जा लागू नाही असे घटक ISO दर्जाचे / प्रणालीचे घ्यावेत.

६) उपप्रकल्पाची अंमलबजावणी करताना सीबीओस आवश्यक Working Capital तसेच Operational Expenditure यासाठी सीबीओ स्वतः जबाबदार राहील, यासाठी प्रकल्पातून कोणतेही अनुदान देय राहणार नाही.

७) सीबीओमार्फत उभा करावयाच्या पायाभुत सुविधाकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्धतेची खात्री पीआययूचे संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्याने केल्याशिवाय उपप्रकल्पाचे काम सुरु करु नये. प्रकल्प उभा राहीला आणि विद्युत पुरवठाच नाही अशी स्थिती होवू नये.

८) उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेल्या घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास प्रस्तावित रक्कमेच्या ६०% अनुदान देय राहील तथापि सदर घटकाची खरेदी स्पर्धात्मक व पारदर्शकपणे करणे

अनिवार्य राहील. म्हणजेच प्रस्तावित घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास व शासकीय मापदंड उपलब्ध नसल्यास प्रत्यक्ष किंमतीच्या ६०% VGF देय राहील.

९) ज्या शासकीय मापदंडात जीएसटीचा समावेश नाही अशा बाबतीत GST पोटी होणाऱ्या खर्चाच्या (मापदंडाप्रमाणे ग्राह्य किंमतीच्या प्रमाणात) ६०% अनुदान अनुज्ञेय राहील.

१०) उपप्रकल्पासाठी कार्यान्वयन खर्च (Operating Expenditure) एकूण प्रस्तावित रक्कमेच्या ५% पर्यंत अधिकतम रुपये २०.०० लाखाच्या मर्यादेत मंजूर करण्यात येईल. तथापि हा खर्च ही ६०:४० प्रमाणात म्हणजे ६०% अनुदान व ४०% समुदाय आधारीत संस्थेचा स्व:हिस्सा याप्रमाणे राहील. आकस्मिक खर्चामध्ये उपप्रकल्पासाठी जागेच्या नोंदणीकृत भाडे करारासाठी आलेला खर्च, उपप्रकल्पासाठी प्रस्तावित घटकासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा खर्च, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आलेला खर्च, बांधकाम परवानगीसाठी भरण्यात आलेले विविध शुल्क/उपकर, आय.टी. उपकरणे, आवश्यक फर्निचर, स्मार्ट राज्यस्तरीय व विभागस्तरीय बैठकांसाठी खर्च, तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्थापक/लेखापाल नेमणूक तसेच अन्य आकस्मिक खर्च इ. बाबींचा समावेश आहे.

११) प्रकल्पाची अंमलबजावणी ही संबंधीत पीआययू सोबत प्रकल्पाने विहित केलेल्या नमुन्यात Grant Agreement नंतर करावी तसेच प्रकल्पाच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका आणि संपादन पुस्तिकानुसार व वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनानुसार करावी.

१२) या उपप्रकल्पांना समितीने मंजुरी दिली असली तरी निकषांची / अटींची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी प्रकल्प राबविणाऱ्या संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची असेल आणि अशी पूर्तता संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेमार्फत ग्रँन्ट ॲग्रीमेंट करण्यापूर्वी केली जाईल.

१३) मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पातील घटकांसाठी अनुदानाची परिगणना शासकीय योजनांच्या सध्याच्या मापदंडाप्रमाणे ग्राह्य धरून उपप्रकल्प मंजूर केले आहेत. तथापि प्रकल्पाची उभारणी करण्यापूर्वी मापदंडात बदल झाल्यास त्या प्रमाणे अनुदानाची सुधारित परिगणना करून अनुदान देणेबाबतचा निर्णय प्रकल्पामार्फत घेण्यात येईल. हा निर्णय पूर्णतः प्रकल्पाचा राहील. तथापि त्यासाठी फेर सुधारित प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

१४) गोदाम घटक मंजूर केलेल्या सीबीओंना गोदाम WDRA Accredited करणे अनिवार्य राहील.

१५) सीबीओला मंजूर प्रकल्पाच्या स्वहिस्सा निधी (४०%) बँक कर्ज घेवून उभा करावयाचा असल्यास त्यांनी तात्काळ बँकेकडे रितसर कर्ज मागणी प्रस्ताव करावा. बँकेने शासनाकडून अनुदान मिळणार असलेबाबत हा मंजूरी आदेश पुरावा म्हणून ग्राह्य धरावा. त्या अनुषंगाने सीबीओने कर्ज मंजुरीचे पत्र प्राप्त करून घ्यावे.

१६) सीबीओ स्व हिस्सा निधी स्वत: उभा करणार असेल तर स्वहिस्सा रक्कम जमा करण्यासाठी जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या शाखेमध्ये स्वतंत्र चालू बँक खाते उघडण्यात यावे. सदर खाते सीबीओचे २ संचालक व व्हीएसटीएफ बाबत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा कार्यकारी, व्हीएसटीएफ यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करणे बंधनकारक आहे.

१७) सीबीओने ग्रॅन्ट ॲग्रीमेन्टसाठी आवश्यक कागदपत्र ३० दिवसाच्या आत प्रकल्प अंमलबजावणी कक्षास सादर करावे व सीबीओनिहाय नोडल अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीत केलेले ग्रॅन्ट ॲग्रीमेन्ट व त्यासोबतची सहपत्रे स्मार्ट कार्यालयास सादर करावीत.

१८) प्रकल्पाने निर्गमित केलेल्या संपादन (खरेदी) मार्गदर्शक सुचना, संपादन पुस्तिका व सामाजिक अंमलबजावणी पुस्तिकेनुसार मंजुर घटकांची खरेदी करण्यात यावी.

१९) संबधीत समुदाय आधारीत संस्थेने CBO प्रकल्पाच्या वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सुचनांप्रमाणे उपप्रकल्पांची अंमलबजावणी करावी.

२०) संबंधित समुदाय आधारित संस्थेने उपप्रकल्पात मंजूर केलेल्या अनुदानाचा विनियोग हा उप प्रकल्पात नमूद बाबींवरच करणे बंधनकारक आहे.

२१) उप प्रकल्पातील मंजूर बाबींवर खर्च करताना देयकाची रक्कम संबंधित विक्रेत्याला (Vendor) रोखीने न देता संबंधिताच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात यावे.

२२) उपप्रकल्प उभारणीनंतर किमान १० वर्षे उपप्रकल्पामधून निर्माण झालेल्या बांधकाम /मशिनरी /औजारे/सुविधा/ मालमत्तेची पुर्व परवानगी शिवाय विल्हेवाट लावता येणार नाही.

२३) उपप्रकल्पास वेळोवेळी भेटी देण्यास आलेल्या अधिकारी/ कर्मचारी तसेच लेखापरीक्षक यांना सविस्तर माहिती लेखे उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

२४) उपप्रकल्प अंमलबजावणी करत असताना प्रकल्पास द्यावयाची माहिती / एमआयएस डाटा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

२५) समुदाय आधारीत संस्थेने उपप्रकल्पातील एखादा घटक अपूर्ण ठेवल्यास (उदा.दालमील घटकात शेड उभारले परंतु दालमील स्थापित न केल्यास सदर घटक अपूर्ण समजण्यात येईल.) त्या अनुदानाचा बोजा संचालकांवर निश्चित करण्यात येईल व महसुल वसुली पध्दतीप्रमाणे अनुदान वसुल करण्यात येईल. तसेच अनुदानाचा गैरवापर केल्यास अनुदानाचे महसुल वसुली पध्दतीप्रमाणे संचालकांकडून वसुल करण्यात येईल.

२६) उपप्रकल्प राबवितेवेळी संबंधित समुदाय आधारीत संस्थेकडून प्रकल्पाची कोणत्याही प्रकारची दिशाभूल अथवा गैरव्यवहार होत असल्याचे प्रकल्पाच्या निदर्शनास आल्यास सदर उपप्रकल्पाचे मंजुर आदेश रद्द करण्याचे अधिकार प्रकल्पास असतील.

वरील अटी व शर्तीचे पालन करुन उपप्रकल्पाची अंमलबजावणी विहीत वेळेत करण्यात यावी.



**मुख्य कार्यकारी अधिकारी -व्हीएसटीएफ**
**तथा प्रमुख प्रकल्प अंमलबजावणी कक्ष,**
**व्हीएसटीएफ - स्मार्ट प्रकल्प**